मासिक
# स्वराज दुनिया
संपादक : शिवाजी बबन खेडकर मो. नं. ८०५५७२२११०
■ RNI No. : MAHMAR/2024/89748
■ DECL NO : SDM/SR/06/2024 Dt. : 16/02/2024
■ unoindia1977@gmail.com
■ वर्षे २ रे ■ अंक ३ ■ मे २०२५ ■ मुल्य : २५ रु ■ वार्षिक वर्गणी : २५० रु. ■ पान ४

## यूपीएससीत पुण्याचा अर्चित डोंगरे राज्यात पहिला

नवी दिल्ली : केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या यूपीएससी परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला असून शक्ती दुबे या महिला उमेदवाराने देशात पहिला क्रमांक पटकावला तर हर्षिता गोयल देशात दुसरी आली असून पुण्याच्या अर्चित डोंगरेने देशात तिसरा आणि महाराष्ट्रात पहिला आला आहे. यंदाही यूपीएससी परीक्षेत महाराष्ट्राने आपली पताका फडकावली असून पुणे, ठाण्यासह विविध जिल्ह्यातील उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये मुलींनीही दैदिप्यमान कामगिरी बजावली आहे.

यूपीएससी परीक्षा २०२४ चा निकाल आज जाहीर करण्यात आला असून यूपीएससी डॉट जीओव्ही डॉट ईन या वेबसाईटवर हा निकाल पाहता येणार आहे. यंदाच्या परीक्षेत शक्ती दुबे या उमेदवाराने देशात प्रथम क्रमांक पटकावला असून एकूण १००९ उत्तीर्ण उमेदवारांची यादी प्रकाशित करण्यात आली आहे. यामध्ये ३३५ सर्वसाधारण, १०९ ईडब्ल्यएस, ३१८ ओबीसी, १६० एससी, ८७ एसटी प्रवर्गातील उमेदवार आहेत. या उमेदवारांच्या १७ एप्रिल २०२५ पर्यंत मुलाखती घेण्यात आल्या होत्या. ७ जानेवारी २०२५ पासून मुलाखतीच्या राऊंडला सुरुवात झाली होती. २०२४ च्या परीक्षेत यूपीएससीने आयएएस, आयपीएससह एकूण ११३२ पदांसाठी भरती काढली होती.

देशात पहिली आलेल्या शक्ती दुबेने अलाहाबाद विद्यापीठातून बायोकेमिस्ट्रीमध्ये पदवी (विज्ञान पदवी) पूर्ण केली. तिने राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय संबंध हा पर्यायी विषय निवडला आणि त्यात पात्रता मिळविली. २०१८ पासून तिचे प्रयत्न सुरू होते. सात वर्षांच्या कठोर परिश्रमानंतर तिला यश मिळाले.

# अतिरेकी हल्ल्यात २७ पर्यटक ठार

## काश्मिरात पर्यटकांवर भ्याड हल्ला, घटनास्थळी रक्ताचा सडा



**पहलगाम :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम जिल्ह्यात मंगळवारी दहशतवाद्यांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात २७ पर्यटकांचा मृत्यू झाला तर २ डझनहून अधिक पर्यटक जखमी झाले आहेत. ७ ते ८ दहशतवाद्यांनी पर्यटकांना टार्गेट करत थेट गोळीबार केला. त्यानंतर दहशतवाद्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. या दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी टीआरएफ या दहशतवादी संघटनेने स्वीकारली आहे. हल्लेखोर पोलिसांच्या गणवेशात आले होते. तसेच त्यांनी धर्म विचारून गोळ्या झाडल्या अशी प्रत्यक्षदर्शींची माहिती आहे. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तातडीने जम्मू-काश्मीरला रवाना झाले असून, हल्लेखोरांना सोडणार नाही, असा इशारा दिला आहे.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे देश-विदेशातील पर्यटक मोठ्या संख्येने आलेले होते. यामध्ये गुजरात, तामिळनाडू, उडिसा, महाराष्ट्रातील पर्यटकांचाही समावेश होता. आज पोलिसांच्या वेशात तिथे अतिरेकीआले आणि त्यांनी थेट जात विचारून पर्यटकांवर बेछूट गोळीबार सुरु केला. या भ्याड हल्ल्यात तब्बल २७ पर्यटक मृत्युमुखी पडले असून, ८ ते १० जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये दोन विदेशी नागरिक आणि दोन महाराष्ट्रीय आहेत. दरम्यान, जखमींपैकी अनेकांची प्रकृती गंभीर आहे. घटनास्थळी अक्षरशः रक्ताचा सडा पडला होता. या घटनेने देश हादरला आहे.

दहशतवाद्यांनी एका मागून एक पर्यटकांना टार्गेट केले. २००६ नंतरचा जम्मू-काश्मीरमधील हा सर्वात मोठा हल्ला असल्याचे सांगितले जाते. अर्थात गेल्या दोन दशकांत काश्मीरमधील पर्यटकांवर झालेला हा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला आहे. हा भ्याड हल्ला झाल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तातडीने जम्मू-काश्मीरला रवाना झाले आहेत. या हल्ल्यात सहभागी असणा-यांना सोडले जाणार नाही, असे अमित शहांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील या हल्ल्याचा निषेध करत मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत. या हल्ल्यानंतर जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी संवेदना व्यक्त करत या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला.

---

## उष्माघाताच्या धोक्यात वाढ

**पुणे :** उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागल्याने उष्माघाताच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे. राज्यात उष्माघाताची रुग्णसंख्या ४९ वर पोहोचली आहे. राज्यात नागपूरमध्ये सर्वाधिक रुग्ण असून, पुण्यातही एका रुग्णाची नोंद झाली आहे.

राज्यात १ मार्च ते २२ एप्रिल या कालावधीत उष्माघाताचे ४९ रुग्ण आढळून आले असून, त्यात नागपूरमध्ये सर्वाधिक ८ रुग्ण आढळले आहेत. त्याखालोखाल बुलढाणा ७, जालना आणि परभणी प्रत्येकी ५, गडचिरोली ४, कोल्हापूर, लातूर, नाशिक, पालघर, रायगड आणि वर्धा प्रत्येकी २, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, धाराशिव, पुणे, सांगली, ठाणे, वाशीम आणि यवतमाळ प्रत्येकी १ अशी रुग्णसंख्या आहे. राज्यात अद्याप उष्माघातामुळे एकही मृत्यू झाल्याची नोंद नाही, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली.

## पोप फ्रान्सिस यांचे निधन

■ वयाच्या ८८ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**नवी दिल्ली :** पोप फ्रान्सिस यांचे निधन झाल्याची माहिती व्हॅटिकनकडून देण्यात आली आहे. सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी पोप फ्रान्सिस यांचे निधन झाले. त्यांनी त्यांचेसंपूर्ण आयुष्य रोम येथील चर्चच्या सेवेसाठी वेचले. पोप फ्रान्सिस यांनी आपल्याला आयुष्यातली मूल्यं शिकवली. तसंच धैर्य आणि प्रेम यांचा संदेश दिला असे म्हणत व्हॅटिकनने या संदर्भातले वृत्त दिले आहे. व्हॅटिकनकडून एक व्हिडिओ संदेश देण्यात आला. त्या संदेशात पोप फ्रान्सिस यांच्या निधनाचें वृत्त देण्यात आले.

पोप फ्रान्सिस यांचे सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी निधन रोमन कॅथलिक चर्चचे पहिले लॅटिन अमेरिकन पोप फ्रान्सिस यांचं निधन झाले. त्यांच्या फुफ्फुसांमध्ये न्यूमोनिया संसर्ग झाला होता. त्यामुळे त्यांची प्रकृती बिघडली होती. फेब्रुवारी महिन्यात रोम येथील जेमेली रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. त्यावेळी त्यांची प्रकृती आधी ढासळली होती पण नंतर हळूहळू त्यांची प्रकृती सुधारली आणि त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आज सकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी पोप फ्रान्सिस यांची प्राणज्योत मालवली.

कार्डिनल जॉर्ज मारियो बर्गोग्लिओ यांची २०१३ मध्ये बेनेडिक्ट सोळावे यांचे उत्तराधिकारी म्हणून निवड झाली होती. त्यांना पोप फ्रान्सिस म्हटले जाते. पोपपदी येणारे युरोपबाहेरचे ते पहिले पोप ठरले होते. २६६ व्या पोपपदी त्यांची निवड झाली त्यावेळी सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता.

## पुण्यातील लाकडी वाड्याला भीषण आग

**पुणे :** पुणे शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिराशेजारील लाकडी वाड्याला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे.ही आग विझविण्यासाठी १० अग्निशामक दलाच्या गाड्या दाखल झाल्या आहेत.तसेच आगीच् नेमक कारण अद्यापपर्यंत समजू शकले नाही. अग्निशामक विभागाच्या अधिकार्यांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिराशेजारील वाड्याला भीषण आग लागल्याची माहिती १ वाजून ६ मिनिटांनी आम्हाला मिळाली. त्यानुसार आम्ही पुढील काही मिनिटात घटनास्थळी दाखल झालो आणि तोवर शहरातील अनेक भागातील अग्निशामक दलाच्या जवळपास १० गाड्या, पाच अधिकारी,पन्नास जवानांच्या मदतीने आग विझवण्याचे काम सुरु केले.

## खंडाळा घाटात अपघात; ३ ठार,१४ जखमी

**लोणावळा :** जुन्या मुंबई-पुणेमहामार्गावरील बोरघाट परिसरातील तीव्र उतारावर नियंत्रण सुटलेल्या ट्रकने रविवारी रात्री पावणे अकराच्या सुमारास पाच वाहनांना जोरदार धडक दिली. त्यात कारमधील बाप-लेकीसह तीन जणांचा जागीच मृत्यू झाला असून, १४ जण जखमी झाले आहेत. त्यांच्यावर पुण्यातील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

लोणावळा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर पांडुरंग इंगुळकर (रा. पुणे) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. ट्रक मुंबईच्या दिशेने जात असताना खंडाळा घाटातील उतारावर ब्रेक फेल झाल्याने चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रकने समोरून येणा-या पाच वाहनांना जोरदार धडक दिली. त्यात प्रिया सागर इंगुळकर (वय ३५, पुणे), निलेश संजय लगड (वय ४२ वर्षे), श्राव्या निलेश लगड (वय १२ वर्षे, दोन्ही रा. सदशिवपेठ, पुणे) यांचा जागीच मृत्यू झाला.

मुंबई पुणे महामार्गावर रविवारी रात्री पावणे अकराच्या सुमारास खंडाळा बॅटरी हिल या ठिकाणी भरधाव वेगातील ट्रक हा पुण्याहून मुंबईच्या दिशेने जात होता. ट्रकने समोरील इनोव्हाला धडक दिली. त्या धडकेमुळे इनोव्हा गाडी समोरून येणारी एर्टिगाला जाऊन धडकली. या भीषण अपघातामध्ये १४ जण किरकोळ जखमी झाले आहेत.

---

# राज्यात पाणी टंचाईच्या झळा

टँकरच्या फे-या वाढल्या; जनावरांच्या पाण्याचा प्रश्न भीषण

मुंबई : एप्रिल महिन्यातच सूर्यदेव आग ओकत असल्याने राज्यातील अनेक धरणे, तलावातील जलसाठा कमी झाला. नदी-नाले तर कधीच कोरडेठाक झाले आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना उन्हाच्या तीव्र झळांसह पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.

दरम्यान, एप्रिल महिन्यातच उष्णतेच्या तीव्र लाटेने अंगाची लाही लाही होत आहे. उन्हाच्या झळांसोबतच राज्यातील अनेक धरणे, तलावातील जलसाठा कमी झाला आहे. नदी-नाले तर कधीच कोरडेठाक झाले आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. काही ठिकाणी टँकरच्या फे-या सुरू झाल्या आहेत. तर राज्यातील अनेक ग्रामपंचायतींवर हंडे मोर्चे निघत आहेत. उन्हाळ्यापूर्वी पाण्यासाठीची कोणतीच तजवीज स्थानिक स्वराज्य संस्थांनी न केल्याने नागरिकांचा असंतोष दिसून येत आहे.

### अमरावती विभागात भीषण पाणी टंचाई

अमरावती आणि बडनेराचा शहराचा पाणी पुरवठा दोन दिवस बंद राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने दिली आहे. त्यामुळे पाणी जपून वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नेरपिंगळाई जवळ १५०० मिमी व्यासाची पाईपलाईन लीक झाल्याने आता दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. दोन दिवस पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने अमरावतीसह बडनेरा शहरात जलसंकट उभे ठाकले आहे.

चिखलदरा आणि चांदुर रेल्वे तालुक्यातील सात गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. अमरावती जिल्ह्यातील ७७६ गावांसाठीच्या तातडीच्या उपाययोजना ५० टक्क्यांवरच असल्याने पाणी पुरवठ्याचे नियोजन कोलमडले आहे.

यवतमाळ, अकोला, वाशिम, बुलडाणा या पाच जिल्ह्यांतील प्रकल्पांच्या घशाला कोरड पडण्याच्या मार्गावर आहेत.

### चंद्रपुरात भीषण पाणी टंचाई

चंद्रपूर शहरातील विविध वॉर्डात भीषण पाणीटंचाई आहे. नागरिकांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. मनपाचे दररोज विविध वार्डांमध्ये १८० टँकर फे-या करत आहेत. अमृत योजनेचे कामकाज संथगतीने असल्याने शहराच्या विविध भागात पाणी टंचाई भासत आहे. अपुरे पाणी मिळत असल्याने नागरिक हतबल झाले आहेत.

### जालना जिल्ह्यात पाणी टंचाई

जालना जिल्ह्यातील ६४ प्रकल्पांपैकी ३ प्रकल्प पूर्णत: कोरडे ठाक पडले असून २४ प्रकल्पांमध्ये केवळ मृत साठा शिल्लक आहे. उन्हाचा पारा अधिकच वाढत चालल्याने पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. परिणामी झपाट्याने पाणी पातळी खाली जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातल्या अनेक गावांतील नागरिकांना पाणी टंचाईच्या झळा बसायला सुरुवात झाली आहे.

### यवतमाळकरांना पाणी टंचाईचे चटके

यवतमाळ जिल्ह्यात ७१ हजार नागरिकांना पाणी टंचाईचे चटके बसत आहेत. प्रशासनाकडून ५७ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. तर जिल्ह्यातील ३२० गावांत पाणीटंचाईचा फटका बसला आहे. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी ३ कोटींचा कृति आराखडा तयार करण्यात आला आहे.

### धुळेकरांना सध्या दिलासा

धुळे शहराला पाणीपुरवठा करणा-या डेडर गाव तलावामध्ये ९० टक्के जलसाठा शिल्लक आहे. डेडरगाव तलाव हा १५० दशलक्ष घनमीटर क्षमतेचा असून याद्वारे मोहाडी अवधान मिल परिसर या भागामध्ये पाणीपुरवठा केला जातो. गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे शहराला पाणीपुरवठा करणा-या नकाने तलाव, डेडरगाव तलाव आणि हरणमाळ तलावात समाधानकारक पाणीसाठा शिल्लक असला तरी नागरिकांनी पाणी जपून वापरावे असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# संपादकीय

## तुझे नी माझे व्हावे मिलन..!

'गंध फुलांचा गेला सांगून, तुझे नी माझे व्हावे मिलन' असे एक गीत आहे. फुलांचा गंध संपण्याची वेळ आली, फुले कोमेजून जाऊ लागली; परंतु मिलन काही होत नाही. महाराष्ट्रातील दोन नेत्यांची, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या ठाकरे बंधूंची अशीच प्रतिकात्मक स्थिती झाली आहे. मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे एकत्र येणार का? असा सवाल गत अनेक वर्षापासून सतत विचारला जात आहे. अभिनेते-दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या 'वास्तव द ट्रूथ' या यूट्युब चॅनेलसाठी राज ठाकरे यांची मुलाखत घेताना पुन्हा तोच प्रश्न विचारण्यात आला आणि शिळ्या कढीला ऊत आला. राज ठाकरे यांनी राजकारणाला शोभेल असे उत्तर देताना म्हटले की, आमच्यातील वाद, भांडणे छोटी आहेत. त्या वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे त्यामुळे एकत्र येणे कठीण नाही; पण विषय इच्छाशक्तीचा आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांनी भारतीय कामगार सेनेच्या कार्यक्रमात या प्रस्तावावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, आमच्यातील किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला तयार आहे मात्र महाराष्ट्राच्या हितासाठी युती करायची की भाजपसोबत जायचे, हे स्पष्ट करायला हवे.

चोरांना पाठिंबा नाही ही शिवरायांची शपथ घ्या. राज आणि उद्धव कधीही एकत्र येणार नाहीत, असे काही जणांचे मत आहे तरीही सतत हा विषय काढून त्यावर वक्तव्य करत प्रसिद्धी मिळवण्याची काही जणांना हौस आहे, असो. महेश मांजरेकरांच्या यूट्युब चॅनेलसाठी मुलाखत घेताना मांजरेकरांनी उद्धव ठाकरे आणि तुमची युती होऊ शकते का? असा प्रश्न विचारला. त्यावर राज म्हणाले, आमच्यातले वाद किरकोळ आहेत आणि महाराष्ट्र खूप मोठा आहे. महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी, मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी बाकी सा-या गोष्टी क्षुल्लक आहेत. आपण लार्जर पिक्चर बघणे गरजेचे आहे. एकत्र येणे आणि एकत्र राहणे फार कठीण आहे, असे मला वाटत नाही. माझ्या इच्छेचा आणि स्वार्थाचा प्रश्न नाही. शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर माझा विचार होता की, आपण बाळासाहेब सोडून कोणाच्या हाताखाली काम करायचे नाही; परंतु मी शिवसेनेत होतो तेव्हा माझी उद्धव सोबत काम करण्यास काहीच हरकत नव्हती. आमची युती व्हावी, अशी महाराष्ट्राची इच्छा असेल तर महाराष्ट्राने त्यांना (उद्धव ठाकरेंना) जाऊन सांगावे. छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये मी माझा इगो कधी आणत नाही, आणलाही नाही.

उद्धव ठाकरे यांनीही राज ठाकरे यांच्या प्रस्तावावर लगेच आपली भूमिका स्पष्ट केली. दादरच्या शिवाजी महाराज स्मृती मंदिरात कामगार सेनेच्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे म्हणाले, मराठीसाठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी अगदी किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला मीसुद्धा तयार आहे. मी मराठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी सर्व मराठी माणसांना एकत्र येण्याचे आवाहन करतो; पण माझी एक अट आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी हे लोक महाराष्ट्रातील उद्योगधंदे गुजरातला घेऊन जात होते तेव्हाच तुम्ही विरोध केला असता तर आज हे सरकार दिल्लीत बसले नसते. आम्ही महाराष्ट्राच्या हिताचा विचार करणारे सरकार केंद्रात बसवले असते. महाराष्ट्रातसुद्धा आपल्या महाराष्ट्राचा विचार करणारे सरकार बसले असते. त्याच वेळी हे काळे कामगार कायदे कच-याच्या पेटीत फेकून दिले असते; पण तेव्हा पाठिंबा द्यायचा, आता विरोध करायचा, मग परत तडजोड करायची हे असे चालणार नाही.

महाराष्ट्राच्या हिताच्या आड जो कोणी येईल त्याचे स्वागत मी करणार नाही, त्याला मी घरी बोलावणार नाही, त्याच्या घरी जाणार नाही, हे पहिल्यांदा ठरवा. त्यानंतर महाराष्ट्राच्या हिताच्या गोष्टी करा. बाकी आमच्यात माझ्याकडून कोणतीही भांडणे नव्हतीच. जी होती ती आजच मी मिटवून टाकली. कुणासोबत गेल्यानंतर महाराष्ट्राचे, मराठी व हिंदुत्वाचे हित होणार हे ठरवा मग पाठिंबा द्यायचा की विरोध करायचा हे ठरवा. महाराष्ट्राचे हित ही माझी एकच अट आहे. मराठीच्या मुद्यावर एकमत असलेले; पण एकमेकांपासून दूर असलेले ठाकरे बंधू कधी एकत्र येणार? अशी उत्सुकता राज्यातील तमाम शिव आणि मनसैनिकांना लागून राहिली आहे. अनेकदा टाळी देण्याचे प्रयत्न झाले; पण हे बंधू एकत्र येण्याची चिन्हे दिसत नव्हती; पण सध्या स्वत:च्याच अस्तित्वासाठी लढणा-या उद्धव आणि राज ठाकरे यांनी आता मात्र एकमेकांना पुन्हा एकदा टाळी देण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे राज्याचे राजकारण पुन्हा एकदा वेगळे वळण घेण्याची शक्यता असून ठाकरे बंधू एकत्र येण्याची शक्यता दुणावली आहे.

राजकारणात काहीही होऊ शकते त्यामुळे राजकारणात कोणीही कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो, असे म्हटले जाते. त्यानुसार गत दोन दशकांहून अधिक काळ वेगवेगळी चूल मांडणारे राज आणि उद्धव ठाकरे यांची आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीपूर्वी युती होऊ शकते, असे संकेत आहेत. दोन्ही ठाकरे एकत्र आले तर आम्हाला आनंदच होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. कोणीही आपल्यातील मतभेद विसरून एकत्र येत असतील तर त्यामध्ये कोणीही वाईट वाटण्याचे कारण नाही, असे ते म्हणाले. ऑफर देणारे आणि त्याला प्रतिसाद देणारे यांच्या बाबत मला जास्त विचारण्यापेक्षा त्यांनाच विचारले पाहिजे, असेही फडणवीस म्हणाले. मनसे आणि शिवसेना ठाकरे या दोन्ही पक्षांनी काय भूमिका घ्यावी हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे.

राज आणि उद्धव यांनी एकत्र यावं की नाही या बाबत दुस-या कोण्या राजकीय पक्षाने सांगण्याचे काही कारण नाही. प्रत्येकाने आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून जे त्यांना योग्य वाटते, तो निर्णय त्यांनी घ्यावा, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. उद्धव आणि राज या दोन्ही भावांनी एकत्र यावं ही लोकभावना आहे. एकत्र आल्यास त्याचा महापालिकेत चांगला परिणाम होऊ शकतो, असे जनमत आहे. सध्या मुंबईत इतर भाषिकांची सुरू असलेली दादागिरी, वाद यामुळे मराठी माणूस नाराजच नाही तर संतापलेला आहे. त्यांना एका चांगल्या पर्यायाची प्रतीक्षा आहे म्हणून गंध, फुले ओरडून सांगताहेत तुमचे व्हावे मिलन!

# मेहुल चोक्सी जाळ्यात

पंजाब नॅशनल बँकेत कोट्यवधींचा घोटाळा करणा-या मेहुल चोक्सी याच्या प्रत्यार्पणाची विनंती भारताने केल्यानंतर बेल्जियम पोलिसांनी त्याला अटक केली. सीबीआयच्या विनंतीवरून त्याला शनिवारी अटक करण्यात आली. कोट्यवधींचा कर्ज घोटाळा करून तो पळाला होता. १३ हजार ५०० कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप मेहुल चोक्सी आणि त्याचा भाचा नीरव मोदीवर आहे. ईडी आणि सीबीआयने त्याला 'वॉण्टेड' जाहीर केले होते. काही दिवसांपूर्वी चोक्सी आजारी असल्याची माहिती समोर आली होती. त्याला कर्करोग झाल्याची शक्यताही वर्तवण्यात आली होती.

मेहुल चोक्सीवर नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांच्या कायद्यानुसार फरार आर्थिक गुन्हेगार घोषित केल्यास चोक्सीच्या जप्त केलेल्या सा-या संपत्तीवर टाच आणण्याची प्रक्रिया तपास यंत्रणेने सुरू केली आहे. त्यामुळे त्याची आर्थिक कोंडी करणे शक्य होईल. मात्र, चोक्सीने प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देऊन तूर्तास भारतात परतणे शक्य नाही असे त्याच्या याचिकेत म्हटले आहे. त्यामुळे चोक्सी भारतात येण्याची प्रक्रिया लांबू शकते. मेहुल चोक्सीचा पासपोर्ट भारत सरकारने रद्द केला आहे. पीएमएलए न्यायालयात चोक्सीच्या पासपोर्ट निलंबनासंदर्भातील कागदपत्रे आणि त्याच्याविरुद्ध ईडी प्रकरणाच्या तपास फाईल्स मागवण्याचे निर्देशही यापूर्वी देण्यात आले होते. बेल्जियम पोलिसांनी चोक्सीला अटक केल्याने आता त्याच्या प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा झाल्याचे म्हटले जात आहे. सुमारे १४ हजार कोटी रुपयांच्या पंजाब नॅशनल बँक (पीएनबी) घोटाळ्यातील आरोपी मेहुल चोक्सीला कर्करोगाची लागण झाली असून तो बेल्जियममध्ये एका खासगी रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती त्याच्या वकिलांनी फेब्रुवारी महिन्यात मुंबईतील ईडीच्या विशेष न्यायालयात दिली होती.

त्यानुसार शनिवारी बेल्जियम पोलिसांनी एका खासगी रुग्णालयातून त्याला अटक केली. पीएनबी घोटाळ्यातील मुख्य आरोपी नीरव मोदी याचा मेहुल चोक्सी हा मामा आहे. या मामा-भाच्यानी पंजाब नॅशनल बँकेच्या काही उच्चपदस्थ अधिका-यांशी संगनमत करून बँकेची बनावट हमीपत्रे (लेटर ऑफ अंडरटेकिंग) तयार केली. या बनावट हमीपत्रांच्या सहाय्याने त्यांनी परदेशात बँकांकडून मोठ्या रकमेची कर्जे मिळवली. तसेच परदेशात क्रेडिट सुविधा मिळवून बँकेची सुमारे १४ हजार कोटी रुपयांची फसवणूक केली, असा आरोप आहे. ६५ वर्षीय चोक्सी हा भारतातील गीतांजली जेम्स लि. या कंपनीचा मालक आहे. त्याच्या हिरेजडित दागदागिन्यांची निर्मिती करणारा उद्योग २०१८ मध्ये पीएनबी घोटाळा उघड झाल्यानंतर बंद पडला. त्याच वर्षी चोक्सी भारताबाहेर फरार झाला. सुरुवातीला त्याने अँटिग्वा अँड बर्मुडा या देशाचे नागरिकत्व मिळवले. गतवर्षी तो बेल्जियममध्ये वास्तव्यास आला. भारतीय तपास यंत्रणांना गेली सात वर्षे गुंगारा देणा-या चोक्सीला अटक होण्याची ही पहिलीच वेळ नाही.

या आधी मे २०२१ मध्ये त्याला डोमिनिका देशात बेकायदेशीरपणे प्रवेश केल्याच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली होती. तेव्हादेखील भारतीय तपास यंत्रणांनी त्याच्या प्रत्यार्पणासाठी प्रयत्न केले होते. मात्र, डोमिनिकाच्या न्यायालयाने त्याला वैद्यकीय उपचारासाठी पुन्हा अ‍ॅन्टिग्वाला जाण्याची परवानगी दिल्याने प्रत्यार्पणाचे प्रयत्न अपयशी ठरले होते. त्यानंतर ईडीने चोक्सीशी संबंधित २ हजार ५०० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली. न्यायालयाने या मालमत्तांचा लिलाव करण्यास परवानगी दिली आहे. चोक्सीचे येणे ही काँग्रेससाठी डोकेदुखी ठरेल असे म्हटले जात आहे. कारण चोक्सी भारतातून पळाल्यानंतर काँग्रेस नेत्यांनी भाजपवर तोफा डागल्या होत्या. केंद्रात भाजपचे सरकार होते. भाजपने त्याला पळून जाण्यासाठी मदत केली. सरकारच्या अकार्यक्षमतेमुळे त्याला परत आणणे शक्य होत नसल्याचा दावाही काँग्रेस नेत्यांनी केला होता. चोक्सी भारतातून पळाल्यानंतर काँग्रेसने मोठा गदारोळ केला होता. 'सगळेच मोदी चोर असतात' असे विधान करण्यापर्यंत मजल गेली होती.

या विधानाच्या विरोधात राहुल गांधी यांच्या विरोधात खटला दाखल करण्यात आला होता. भारताने जागतिक महाशक्ती असलेल्या अमेरिकेतून दहशतवादी तहव्वूर राणाला भारतात आणले आहे. त्या तुलनेत चोक्सी याला भारतात आणणे सोपे आहे. कारण त्याला बेल्जियममध्ये अटक झाली आहे. हिरे व्यापारी चोक्सी आणि नीरव मोदी यांनी पीएनबी बँकेला चुना लावून भारताबाहेर पलायन केले. चोक्सीचे काँग्रेस पक्षाशी संबंध असल्याने भाजप सरकार त्याला टार्गेट करीत आहे असा आरोप चोक्सीच्या वकिलांनी केला होता. गीतांजली जेम्स या चोक्सीच्या कंपनीने राजीव गांधी फाऊंडेशनला देणग्या दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. २०१५ मध्ये एका फसवणूक प्रकरणात मेहुल चोक्सीची बाजू मांडणारे वकील चंद्रमौली यांना काँग्रेसने विधानसभा निवडणुकीत उमेदवारी दिल्याचा आरोप भाजपने केला होता. चोक्सीशी संबंध असल्याचे आरोप काँग्रेस नेते पी. चिदम्बरम, अभिषेक मनु सिंघवी यांच्यावरही झाले आहेत. राजकारणात विरोधक एकमेकावर चिखलफेक करतच असतात. असो. किंगफिशरचे मालक विजय माल्ल्या, चोक्सी, नीरव मोदी यांच्या ब-याच मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. तहव्वूर राणाच्या पाठोपाठ आता चोक्सी आणि नीरव मोदी भारतात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हे लगेच होईल असे नाही.

कारण यात काही कायदेशीर अडथळे निर्माण होतात. चोक्सीची कंपनी गीतांजली जेम्स ही ईडीने दाखल केलेल्या अनेक आरोपपत्रांमध्ये समाविष्ट आहे. सीबीआयने चोक्सी, नीरव मोदी आणि बँक अधिका-यांसह इतरांवर फसवणूक, गुन्हेगारी कट आणि भ्रष्टाचारासंबंधी खटले दाखल केले आहेत. चोक्सीला भारतात आणल्यानंतर त्याचे कोणाकोणाशी संबंध आहेत ते स्पष्ट होईल. बडे उद्योगपती, व्यावसायिक यांनी देशातील बँकांकडून प्रचंड मोठ्या रकमेचे कर्ज घ्यायचे, नंतर त्या कर्जाची परतफेड करायची नाही आणि देशाबाहेर पलायन करून आरामात आलिशान आयुष्य जगायचं असा जो सिलसिला सुरू होता तो आता खतम होण्याच्या मार्गावर आहे. विजय माल्ल्या, मेहुल चोक्सी, नीरव मोदी, ललित मोदी, नितीन संदेसरा या लफडेबाजांच्या मुसक्या बांधून त्यांना भारतात आणले पाहिजे. त्यांनी केलेल्या कर्माचे फळ त्यांना दिलेच पाहिजे.

# राष्ट्रपतींनाही कालमर्यादा

तामिळनाडू सरकारने मंजूर केलेली १० विधेयके अडवून ठेवण्याची कृती बेकायदेशीर असल्याचे निरीक्षण नोंदवून त्यांना फटकारणा-या सर्वोच्च न्यायालयाने आता राष्ट्रपतींनाही विधेयकावर निर्णय घेण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतींसाठी वेळेची मर्यादा निश्चित करण्याची ही पहिलीच वेळ आहे. राज्यपालांकडून राष्ट्रपतींकडे पाठवलेली विधेयके आता तीन महिन्यांच्या आत राष्ट्रपतींना निकाली काढावी लागतील, असा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. तामिळनाडू सरकारच्या याचिकेवरील निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने ही टिपण्णी केली. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयाची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.

घटनेच्या कलम २०१ अंतर्गत राष्ट्रपतींच्या निर्णयासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नसल्यामुळे हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. न्यायालयाने सरकारिया आयोग आणि पुंछी आयोगाचाही उल्लेख केला. ज्यामध्ये कलम २०१ अंतर्गत प्रकरणे निकाली काढण्यासाठी निश्चित कालमर्यादा स्वीकारण्याची शिफारस करण्यात आली होती. अनुच्छेद २०१ अंतर्गत राष्ट्रपतींना विधेयकाचा विचार करावा लागतो आणि हे काम वेळेच्या मर्यादेमुळे मर्यादित असू शकते हे आम्हाला मान्य आहे; परंतु ही वस्तुस्थिती राष्ट्रपतींच्या निष्क्रियतेचे समर्थन करू शकत नाही, असे निकाल पत्रात म्हटले आहे. या प्रकरणावर न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, जर एखाद्या संवैधानिक प्राधिकरणाने वाजवी वेळेत आपली कर्तव्ये पार पाडली नाहीत तर न्यायालये त्यामध्ये हस्तक्षेप करू शकतील. जेव्हा राज्यपाल राष्ट्रपतींच्या विचारार्थ विधेयके राखून ठेवतात आणि राष्ट्रपती त्याला संमती देत नाहीत तेव्हा राज्य सरकारला अशा कारवाईला या न्यायालयात आव्हान देण्याचा अधिकार असेल. खंडपीठाने म्हटले आहे की, कोणत्याही वैध कारणाशिवाय किंवा गरजेशिवाय राष्ट्रपतींनी निर्णय घेण्यास विलंब करणे हे संविधानाच्या मुलभूत तत्त्वाच्या विरुद्ध असेल. कोणताही अधिकार मनमानीपणे वापरला जाऊ शकत नाही. खंडपीठाने ८ एप्रिल रोजी राखीव ठेवलेला निर्णय जाहीर केला.

त्यात म्हटले आहे की, तीन महिन्यांपेक्षा जास्त विलंब झाल्यास संबंधित राज्याला त्याबाबत कळवावे लागेल आणि विलंबाचे कारण द्यावे लागेल. तामिळनाडूचे राज्यपाल रवी यांनी राष्ट्रपतींकडे १० विधेयके पाठवली होती. या कृतीला न्यायालयाने बेकायदेशीर आणि चुकीचे असल्याचे म्हटले. राज्यपालांवर विधेयक मंजूर करण्यासाठी सुप्रीम कोर्टाने घातलेली कालमर्यादा हा तर न्यायालयाचा अतिरेक आहे, अशी प्रतिक्रिया केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी दिली आहे. सुप्रीम कोर्टाने राष्ट्रपती व राज्यपालांना विधेयक मंजुरीसाठी निश्चित कालावधी दिला आहे. या निकालाचे पडसाद संपूर्ण देशात उमटत आहेत. जर न्यायालयाने राज्यघटनेत सुधारणा केल्यास संसद व विधानसभेचे काम काय? असा प्रश्न राज्यपाल आर्लेकर यांनी केला. राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी राज्यघटनेत कोणतीही कालमर्यादा नाही. न्यायालयाने ३ महिन्यांची मर्यादा घालणे ही घटनादुरुस्ती केल्यासारखाच प्रकार आहे.

दोन न्यायाधीश राज्य घटनेचे स्वरूप बदलू शकत नाहीत. राज्यपालांकडेही कारणे असू शकतात, असे आर्लेकर म्हणाले. केरळच्या राजभवनात कोणतेही विधेयक प्रलंबित नाही. काही विधेयके राष्ट्रपतींकडे पाठवली आहेत. केरळ सरकारने या प्रकरणात सुप्रीम कोर्टात धाव घेतली असून त्याची सुनावणी १३ मे रोजी होणार आहे. केरळ सरकारने सरन्यायाधीश संजीव खन्ना यांना त्यांचा खटला न्या. पारडीवाला आणि न्या. महादेवन यांच्या खंडपीठाकडे पाठवण्याची विनंती केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अतिरेकी असल्याचे सांगताना न्यायालय आपल्या मर्यादा ओलांडत असून कार्यकारी आणि कायदेमंडळात हस्तक्षेप करत असल्याचा आरोपही आर्लेकर यांनी केला आहे. न्यायालयाने तीन महिन्यांची मर्यादा घालणे म्हणजे न्यायालयाकडून घटना दुरुस्ती करण्यासारखेच आहे. न्याय व्यवस्थापन वर्षानुवर्षे अनेक खटले प्रलंबित ठेवते. हे लक्षात घेता राज्यपालांकडेही विधेयके प्रलंबित ठेवण्याची कारणे असू शकतात, अशी भूमिका आर्लेकर यांनी मांडली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे तामिळनाडू सरकारने राज्यात १० कायदे लागू केले आहेत.

राज्य विधिमंडळाने मंजूर केलेली ही विधेयके शनिवारी राज्य सरकारने अधिकृत राजपत्रात अधिसूचित केली. ज्यामध्ये असे म्हटले आहे की, या कायद्यांना राज्यपाल आर. एन. रवी यांनी मान्यता दिली आहे. तामिळनाडू सरकारचा हा निर्णय देशातील असा पहिलाच प्रकार आहे जिथे राज्य सरकारने राष्ट्रपती किंवा राज्यपालांच्या मान्यतेऐवजी न्यायालयाच्या आदेशाच्या आधारे कायदा लागू केला आहे. गत अनेक दिवसांपासून तामिळनाडूचे राज्यपाल रवी यांनी घटनाबा पद्धतीने विधेयके अडवून ठेवली होती. न्यायालयाने दिलेल्या दणक्यानंतर देशातील विरोधी पक्षातील सरकारमध्ये राज्यपालांची होणारी लुडबूड थांबली जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. राज्यपालांनी संसदीय लोकशाहीच्या स्थापित परंपरांचा आदर करून काम करावे. कायदेमंडळाद्वारे व्यक्त होणा-या जनतेच्या इच्छेचा आदर केला पाहिजे आणि जनतेला जबाबदार असलेल्या निवडून आलेल्या सरकारचाही आदर केला पाहिजे हे आता स्पष्ट झाले आहे. राज्यपालांनी मित्र, तत्त्वज्ञानी आणि मार्गदर्शकाची भूमिका नि:पक्षपातीपणे पार पाडली पाहिजे. राजकीय सोयीच्या विचारांनी नव्हे तर त्यांनी घेतलेल्या संवैधानिक शपथेच्या पावित्र्याने मार्गदर्शन केले पाहिजे. राज्यपालांनी मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने निर्णय घेणे अभिप्रेत असताना विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये त्यांनी अधिकाराचा गैरवापर केला. या बिगर भाजपशासित राज्यात राज्यपाल पदावरील व्यक्तीच्या माध्यमातून सत्ताधा-यांची अडवणूक करण्याचे प्रयत्न घटनेशी विसंगत आहेत. यात केवळ सत्ताधारी लोकप्रतिनिधींचे अवमूल्यन होते असे नाही तर विरोधकांचेही होते. हे सारे विरोधी पक्षांची सत्ता असलेल्याच राज्यांमध्ये घडत होते. भाजपशासित राज्यांमधील राज्यपालांनी विधेयकांना अशा प्रकारे खोडा घालण्याचे काम केल्याचे प्रकार क्वचितच घडले. न्यायालयाच्या निकालामुळे राष्ट्रपतींच्या अधिकारांचा अधिक्षेप होत असल्याचे केंद्र सरकारला वाटत असेल तर ते त्यावर सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करू शकतात. सध्या केंद्रातील भाजप सरकारने आत्मपरीक्षण करण्याची जास्त गरज आहे.

printed by SHIVAJI BABAN KHEDKAR, and published by SHIVAJI BABAN KHEDKAR, Owner by SHIVAJI BABAN KHEDKAR on behalf of Marathi Magazine SWARAJ DUNIYA, printed at M/s. Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shanivar Peth, Pune - 411030 (Maharashtra) and published at Property No. 2585, Gat No. 1026, Old Bhambarde Road, Ranjangaon Ganpati, Tal. Shirur, Dist. Pune - 412209 (Maharashtra) Editor - SHIVAJI BABAN KHEDKAR

मुद्रक शिवाजी बबन खेडकर आणि प्रकाशक शिवाजी बबन खेडकर मालक शिवाजी बबन खेडकर यांचे नावे मराठी मासिक स्वराज दुनिया, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या जवळ, ५३५, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण : प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे – ४१२२०९ (महाराष्ट्र).
संपादक : शिवाजी बबन खेडकर

# पहिलीपासून हिंदीसक्तीला साहित्य महामंडळाचा विरोध

**पुणे :** राज्यात मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना इयत्ता पहिलीपासून सक्तीने हिंदी शिकवण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. या निर्णयाला शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातून तीव्र विरोध करण्यात येत असताना आता अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळानेही हिंदीची सक्ती न करण्याची ठाम भूमिका जाहीर केली आहे, राज्य शासनाने हा निर्णय तातडीने रद्द न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची शालेय शिक्षणाच्या स्तरावर अंमलबजावणी २०२०५-२६पासून करण्याबाबतचा शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने बुधवारी प्रसिद्ध केला. त्यानुसार पहिलीपासून अभ्यासक्रमात हिंदी विषयाचा समावेश करण्यात येणार आहे. अभ्यासक्रम आराखड्यासाठी नियुक्त केलेल्या सुकाणू समितीने हिंदी भाषेची सक्ती न करता अन्य भारतीय भाषांचा पर्याय उपलब्ध करून देण्याची शिफारस केली होती. मात्र, ही शिफारस डावलून शिक्षण विभागाने तिसरी विषय म्हणून पहिलीपासूनच हिंदी विषय सक्तीने शिकवण्याचा निर्णय घेतल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हिंदी सक्तीविरोधात भूमिका घेतली आहे. तसेच, अन्य राजकीय पक्ष, शिक्षण क्षेत्रांतूनही या निर्णयाविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. त्याबरोबरच आता साहित्य क्षेत्रातूनही पहिलीपासून हिंदी शिकवण्यास विरोध दर्शवण्यात आला आहे.

'शासनाने इयत्ता पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याचा निर्णय तत्काळ रद्द केला पाहिजे. कारण तो अन्याय करणारा आहे. मराठी भाषा शिक्षणाचा कायदा सक्तीचा करण्यासाठी लढा द्यावा लागला हे वास्तव आहे,' असे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी सांगितले. अशा परिस्थितीत हिंदी प्रेम कशासाठी, शासनाने मराठी भाषा सल्लागार समिती स्थापित केली आहे. हा मोठा निर्णय घेताना त्या समितीलाही शासनाने विचारले नाही यासारखे दुर्दैव कोणते, असे प्रश्नही त्यांनी उपस्थित करत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ या सक्ती विरोधात तीव्र आंदोलन करेल, असेही त्यांनी नमूद केले. राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे आंदोलन करण्यात आले. 'संपर्कसूत्र म्हणून हिंदी भाषा शिकवली पाहिजे,' या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेचाही तीव्र निषेध करण्यात आला. राज्य शासनाने शासन निर्णय मागे न घेतल्यास शहरात एकही हिंदी पुस्तक छापू देणार नाही, सक्तीने हिंदी शिकवणाऱ्या शाळांना टाळे ठोकण्याचा इशाराही देण्यात आला. आंदोलनावेळी मनविसेचे शहराध्यक्ष धनंजय दळवी, राज्य संघटक प्रशांत कनोजिया, राज्य उपाध्यक्ष ड. सचिन पवार, मनसे कामगार सेना राज्य उपाध्यक्ष नरेंद्र तांबोळी, विभाग अध्यक्ष सुनील कदम, राज्य कार्यकारिणी सदस्य अभिषेक थिटे, शहर उपाध्यक्ष विक्रांत भिलारे आदी या वेळी उपस्थित होते.

## कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी शासन प्रयत्नशील

**मुंबई :** कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) धोरणावरील मसुद्याबाबत सल्लामसलत करून राज्यातील कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करता येईल यासाठी शासन आग्रही असल्याचे कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी सांगितले.

मंत्रालय येथे कृषी विभागाने कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) धोरणावरील मसुद्याबाबत सल्लामसलत करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण कार्यशाळा आयोजित केली होती यावेळी कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी बोलत होते.

प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी म्हणाले की, केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासन शेतकऱ्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये उपयोग करण्यावर भर देत आहे. महाराष्ट्र शासनाने देखील हे धोरण अवलंबले आहे.

या कार्यशाळेत २३ हून अधिक संस्था व ३५ हून अधिक तज्ज्ञ सहभागी झाले होते. यात मोठ्या व मध्यम उद्योगसमूहांचे प्रतिनिधी, स्टार्टअप्स, बहुराष्ट्रीय संस्था आणि शिक्षणतज्ज्ञ यांचा समावेश होता. या कार्यशाळेचा उद्देश म्हणजे राज्यातील कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करता येईल, यावर सखोल चर्चा करण्यात आली.

मुख्यत्वे डेटा गुणवत्ता, डेटा देवाण-घेवाण यंत्रणा, स्थानिक पातळीवर आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे, शेतकऱ्यांना एआय तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी प्रोत्साहन व डेटा मॉनिटायजेशन, स्टार्टअपसाठी सक्षम परिसंस्थेची निर्मिती आदी मुद्द्यांवर चर्चा झाली.

धोरण मसुद्यात शेतकऱ्यांना समग्र विचाराअंती प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यासाठी सक्षम धोरणात्मक चौकट तयार करणे, उत्पादनात वाढ, उत्पादन खर्चात घट, व वास्तविक वेळेतील डेटावर आधारित निर्णयक्षमतेस मदत करणे यावर भर देण्यात यावा याबाबत चर्चा करण्यात आली.

या नव्या धोरणाद्वारे विविध डेटासेट्सचे एकत्रीकरण, शाश्वत व लवचिक शेती पद्धतींचा प्रचार, पुरवठा साखळी कार्यक्षमतेत सुधारणा, संशोधन व नवोपक्रमांना चालना, वित्तीय समावेश आणि क्षमतेचा विकास हे सर्व उद्दिष्ट आहेत. कार्यशाळेत डेटा सुरक्षेचे महत्त्व, डेटा गुणवत्ता व जोखमीचे व्यवस्थापन अशा मूलभूत बाबींवरही चर्चा झाली. एआयच्या मदतीने महाराष्ट्रातील कृषी विकास व शाश्वतता सुनिश्चित करण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी पोक्रा प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंग, कृषी विभागाचे उपसचिव संतोष कराड,जागतिक बँकेचे प्रतिनिधी व्ही. कानुंगो, रंजन समंत्राय आणि जागतिक बँक गटाचे अरुण शर्मा.,फाय्लो कंपनीचे सुधांशु राय, उपस्थित होते.

## अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार - सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई :** रुग्णांना वेळेवर दर्जेदार तसेच कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी रुग्णालये, सोसायटीचे अधिकारी व अंमलबजावणी संस्थांना कठोर दक्षता बाळगावी. यात गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. तसेच अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार अंगीकृत व अन्य तातडीच्या रुग्णालयांमधून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने कार्यवाही करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वरळी, मुंबई येथील मुख्यालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनांच्या कामकाजाचा आढावा मंत्री श्री. आबिटकर यांनी घेतला. यावेळी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.दयानंद जगताप, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सहसचिव अशोक आत्राम, सहायक संचालक डॉ.रवींद्र शेटे आदि उपस्थित होते.

बैठकीदरम्यान मंत्री श्री.आबिटकर यांनी या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. यामध्ये योजनेतील अंगीकृत रुग्णालयांची संख्या १७९२ वरून ४१८० पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत ही निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्याचे त्यांनी आदेश दिले.

## आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी पुन्हा नवी नियमावली

**पुणे :** शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेसाठी नवे नियम करण्यात येणार आहेत. त्यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून, या समितीसमोर पालकांचे अभिप्राय सादर केले जाणार आहेत. त्यामुळे पालकांनी २५ एप्रिलपर्यंत अभिप्राय सादर करण्याचे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत सामाजिक व आर्थिक मागास विद्यार्थ्यांना खासगी शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश दिला जातो. प्रवेशित विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिपूर्ती शासनाकडून खासगी शाळांना करण्यात येते. गेल्या वर्षीही शिक्षण विभागाने आरटीई प्रवेश प्रक्रियेत बदल केला होता. त्यात खासगी शाळांऐवजी शासकीय, खासगी अनुदानित शाळेत प्राधान्याने प्रवेश देण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रियाही राबवण्यात आली.

मात्र, या बदलाला तीव्र विरोध करून न्यायालयात दाद मागण्यात आली. न्यायालयाने शिक्षण विभागाने केलेले बदल रद्द करून पूर्वीच्याच पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे शिक्षण विभागाला जुन्याच पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर, आता आरटीईच्या नियमांमध्ये पुन्हा बदल करण्यात येणार आहेत.

## आदिवासी समाजाची संस्कृती आणि परंपरा जपा - आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांचे आवाहन

**नागपूर :** कुवारा भिवसन देवस्थान पंचकमेटी, भिवगड यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही भीमालपेन जन्मोत्सवानिमित्त भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या पारंपरिक धार्मिक सोहळ्याला परिसरातील हजारो आदिवासी बांधव येत आहेत. श्रद्धा, भक्ती आणि सांस्कृतिक एकात्मतेचा हा उत्सव भाविकांच्या सहभागामुळे अधिकच उत्साही ठरत आहे. आदिवासी समाजाची संस्कृती आणि परंपरा जपण्याचे आवाहन आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी यावेळी केले.

मंत्री श्री. उईके यांनी आज भीवगड येथील भीमालपेन ठाणा देवस्थानाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी पंचकमेटीच्या कार्याचे कौतुक करत भाविकांशी संवाद साधला. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. वित्त व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, देवस्थान समितीचे पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा आणि श्रद्धा हे आपल्या राज्याचे वैभव आहे. ही परंपरा ही केवळ धार्मिक नसून सामाजिक ऐक्याचे प्रतिक आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपली संस्कृती जपण्याचे काम सातत्याने करायला हवे. आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन आणि पुढील पिढीपर्यंत हे वैभव पोहोचवणे गरजेचे आहे. देवस्थानाच्या विकासाठी निधी कमी पडू देणार नसल्याचे मंत्री श्री. उइके यावेळी म्हणाले.

राज्य शासन आदिवासी समाज बांधवांच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. त्यांच्या प्रथा, परंपरांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांना नेहमीच पाठिंबा देईल. कुवारा भिवसन देवस्थानचा विकास येत्या काळात अधिक गतीने करण्यास कटिबद्ध असल्याचे वित्त व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल यावेळी म्हणाले.

## रुग्णांना दर्जेदार सेवा द्या - आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**कोल्हापूर -** राज्य शासन धर्मदाय रुग्णालयांना वेगवेगळ्या पातळ्यांवर मदत करते. या धर्मदाय रुग्णालयांनी त्यांच्याकडे येणाऱ्या रुग्णांना दर्जेदार व सौजन्यपूर्वक सेवा प्रदान करावी, असे आवाहन आरोग्यमंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

उद्यम नगरातील पंत वालावलकर रुग्णालयामध्ये राबविण्यात येणाऱ्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महालक्ष्मी हेल्थ फाऊंडेशनचे संतोष कुलकर्णी होते. पालकमंत्री आबिटकर म्हणाले, धर्मदाय रुग्णालयांनी प्रथमतः रुग्णावरील उपचाराला प्राधान्य द्यावे तसेच आर्थिक कारणावरून रुग्णांची अडवणूक होता कामा नये. रुग्ण, हा डॉक्टरांमध्ये ईश्वराचा अंश पाहतो त्यामुळे डॉक्टरांनीही आपल्यावरील जबाबदारी ओळखावी. धर्मदाय रुग्णालयांनी आपला नावलौकिक कसा वाढेल याकडे लक्ष द्यावे असे आवाहन करून हे रुग्णालय जिल्ह्यातील रुग्णांच्या वैद्यकीय गरजा नक्कीच पूर्ण करेल, असा आशावादही व्यक्त केला.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची सेवा निवृत्तीवेतनासह इतर थकबाकी रक्कम तातडीने वितरित करावी

मुंबई, दि. १७ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची सेवा निवृत्तीवेतनासह आणि इतर थकबाकी रक्कम तातडीने वितरित करण्यात यावी, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

निर्मल भवन येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकारी कर्मचारी संघटनेच्या विविध मागण्यांसाठी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सदस्य सचिव अभिषेक कृष्णा, वित्त विभागाचे संचालक सिताराम काळे यांच्यासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि वित्त विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, निधी उपलब्ध असून तो तातडीने वितरित करावे. सेवानिवृत्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने शासन सकारात्मक आहे. वेतन आयोगाच्या अंमलबजावणी संदर्भातील समस्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून देण्यात येणार असून, यावर लवकरच योग्य निर्णय घेतला जाईल. तसेच ८० आणि ९० वर्षांवरील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम देणे अत्यावश्यक असल्यामुळे त्यावरही सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले.

## 'गाडी मागे घे' म्हटल्याने चौघांची पोलिसाला मारहाण

**कराड :** पुणे- बंगळूरू महामार्गावरील कराड शेजारील ढेबेवाडी फाटा येथे मोटारगाडी चालक आणि पोलिसांमध्ये मोटारगाडी थोडी मागे घे म्हटल्याच्या कारणावरून झालेल्या वादावादीवेळी पोलिसाला मारहाण झाल्याची घटना भरदुपारच्या सुमारास घडली. याप्रकरणी पोलिसांनी चौघांविरोधात गुन्हा दाखल करताना, तिघांना अटकही केली आहे. पोलीस हवालदार ब्रह्मानंद माने यांनी कराड शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार मोटारगाडी चालक व त्याच्या पत्नीसह अन्य दोघांवर पोलिसाला मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करताना, तीन जणांना अटकही करण्यात आली आहे.

## पोलिसांना 'ससून' पुन्हा अहवाल देणार; गर्भवती मृत्यू प्रकरणी रुग्णालयाच्या समितीची आज तातडीने बैठक

**पुणे :** गर्भवती मृत्यू प्रकरणी ससून रुग्णालयाच्या समितीने पाठविलेल्या अहवालाबाबत पोलिसांनी काही शंका उपस्थित केल्या आहेत. याबाबत पोलिसांनी रुग्णालयाला पत्र लिहिले आहे. या पार्श्वभूमीवर रुग्णालयाच्या समितीची बैठक आज होणार असून, तातडीने अहवाल पोलिसांना सादर केला जाणार आहे.

गर्भवती ईश्वरी (तनिषा) भिसे हिच्या मृत्यूप्रकरणात ससून रुग्णालयाच्या समितीने पुणे पोलिसांना सहा पानी अहवाल पाठविला आहे. त्या अहवालात संबंधित महिलेच्या उपचारावेळी वैद्यकीय दिरंगाई झाली का? तसेच डॉक्टरांनी हलगर्जीपणा केला का? असे कोठेही नमूद करण्यात आले नाही. त्यामुळे डॉक्टर, रुग्णालय दोषी आहेत की नाही, याबाबत पोलिसांना काहीच बोध होत नाही. त्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी चार मुद्दे उपस्थित करून पुन्हा ससून रुग्णालयाच्या समितीकडे अभिप्राय मागितला आहे. यावर ससून रुग्णालयाच्या समितीची बैठक उद्या होत आहे. या बैठकीनंतर तातडीने पोलिसांना अहवाल सादर केला जाणार आहे.

गर्भवती मृत्यू प्रकरणात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात वेळेत उपचार न झाल्याने मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने विविध समित्या स्थापन केल्या आहेत. त्यात आरोग्य विभाग समिती, धर्मादाय आयुक्त समिती, माता मृत्यू अन्वेषण समितीसह ससून रुग्णालयातील समितीचा समावेश आहे. ससून रुग्णालयातील समितीने पुणे पोलिसांना नुकताच सहा पानी अहवाल सादर केला.

ससूनच्या अहवालावर पुणे पोलिसांकडून चार मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. त्या चार मुद्द्यांच्या आधारे पोलिसांनी ससून रुग्णालयाच्या समितीकडून नव्याने अभिप्राय मागितला आहे. तो अहवाल प्राप्त झाल्यानंतर नेमका गुन्हा दाखल होईल किंवा नाही, नेमके दोषी कोण, हे ठरविता येणार आहे, अशी माहिती पुणे पोलीस दलातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे.

# राज्यातील प्रत्येक विभागांत आता 'आनंद गुरुकुल'

**पुणे :** राज्यातील प्रत्येक शैक्षणिक विभागात एक याप्रमाणे एकूण आठ आनंद गुरुकुल (विशेष नैपुण्य) निवासी शाळा स्थापन करण्यात येणार आहे. या शाळांच्या माध्यमातून शैक्षणिक विकासासह विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साध्य करण्याचे उद्दिष्ट असून, दोनशे पटसंख्या, नववी ते बारावीचे वर्ग असलेल्या या शाळा २०२५-२६पासून सुरू करण्याचे प्रस्तावित आहे.

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. नियमित शैक्षणिक अभ्यासक्रमासह २१व्या शतकाची गरज विचारात घेऊन क्रीडा, कला, शास्त्र व तंत्रज्ञान, अपारंपरिक ऊर्जा, संवाद कौशल्य, वित्तीय सेवा, व्यवस्थापन, आरोग्य सेवा, जागतिक पर्यटन, कृत्रिम बुद्धिमत्ता, शाश्वत विकास अशा विषयांच्या विशेष नैपुण्य शाखांचा अध्यापन करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना या विषयांचे उच्च शिक्षण घेण्याची गोडी निर्माण होऊन त्या विषयासाठी देशात उच्च दर्जाचे मनुष्यबळ निर्माण होणार आहे.

आनंद गुरुकुल निवासी शाळांची स्थळनिश्चिती करणे, शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विशेष नैपुण्य विषयांचा अभ्यासक्रम ठरवणे, प्रवेश पद्धती निश्चित करणे, या शाळांची नियमित कार्यपद्धती, दिनदर्शिका ठरवणे या संदर्भातील अभ्यास करण्यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट नियुक्त करण्यात आला आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती नेमण्यात आली आहे. तसेच पाच जिल्ह्यांमध्ये सुरू असलेल्या शासकीय विद्यानिकेतन शाळा सुरू आहेत. या व्यतिरिक्त तीन शैक्षणिक विभागात शासकीय विद्यानिकेतनाप्रमाणेच सुविधा उपलब्ध असलेल्या आणि सध्या सुरू असलेल्या शाळांपैकी सुस्थितीत असलेल्या, विकसनासाठी वाव असलेल्या सुयोग्य शाळांची प्रति विभाग एक शाळा याप्रमाणे निवड करावी.

विविध सुविधांच्या सद्य:स्थितीबाबत सविस्तर माहिती घ्यावी. निवास सुविधेसाठी माहिती घेऊन या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने लागणारा आवश्यक निधी विचारात घेऊन शासनाला परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

# महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा प्रेरणास्थान - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**छत्रपती संभाजीनगर :** महाराणा प्रतापसिंह एक राष्ट्रभक्त होते ते शेवटपर्यंत देशासाठी लढत राहिले. छत्रपती संभाजीनगर येथे उभारण्यात आलेला त्यांचा पुतळा आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्थान आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महाराणा प्रतापसिंह यांचा इतिहास अतिशय गौरवशाली आहे. देशाच्या संरक्षणासाठी त्यांनी प्रदिर्घ संघर्ष केला. त्यामुळे ते भारताचे जननायक म्हणून मानले जातात, छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा उभारण्यात आलेला पुतळा आजच्या पिढीसाठी प्रेरणास्त्रोत आहे, खऱ्या अर्थाने महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा प्रेरणा व शौर्याचे प्रतिक आहे,



असे मत केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केले.

छत्रपती संभाजीनगर येथील महानगरपालिकेच्या कॅनॉट गार्डन येथे आज महाराणा प्रतापसिंह यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, पणन मंत्री जयकुमार रावल, विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, खा. डॉ. भागवत कराड, खा. संदीपान भुमरे, आ. प्रदीप जैस्वाल, आ. नारायण कुचे, आ. अनुराधा चव्हाण, आ. संजय केनेकर, महाराणा प्रतापसिंह यांचे वंशज लक्ष्यराज सिंह यांच्यासह महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांचा अश्वारूढ पुतळा हा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या माध्यमातून उभारण्यात आला आणि भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी त्याचे अनावरण केले, याचा आनंद आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात एकीकडे छत्रपती शिवाजी महाराज आणि दुसरीकडे वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा आहे.

# तुम्ही खाताय तो आंबा कसा पिकवला जातोय? आरोग्यासाठी हानिकारक रसायनांचा वापर

**पुणे :** सध्या आंबाचा हंगाम सुरू असून, ते मोठ्या प्रमाणात कृत्रिमरीत्या पिकविले जातात. यासाठी काही विक्रेत्यांकडून कॅल्शियम कार्बाईड आणि एसिटीलीन गॅस या बंदी असलेल्या घटकांचा वापर केला जातो. यामुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने तपासणी मोहीम हाती घेतली आहे.

प्रशासनाकडून फळ व्यापारी आणि विक्रेत्यांची तपासणी मोहीम सुरू आहे. आंब्यासह इतर फळे पिकविण्यासाठी कॅल्शियम कार्बाईडचा वापर केल्याचे आढळून आल्यास कठोर कारवाई केली जाणार आहे. आंबा पिकविण्यासाठी इथिलीन गॅसचा वापर करण्यास परवानगी आहे. असे असले तरी त्यासाठी विशिष्ट नियम आखून देण्यात आले आहे. त्याचे पालन फळ व्यापारी आणि विक्रेत्यांनी करावयाचे आहे. फळांवर थेट इथिलीनची फवारणी करण्यास मनाई आहे, अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाने दिली.

आंबा पिकविण्यासाठी कॅल्शियम कार्बाईडचा वापर होत असल्याचे आढळून आल्यास त्या फळांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार आहेत. याचबरोबर नियमांचा भंग करणाऱ्या विक्रेत्यांवर खटले दाखल केले जाणार आहेत. आंब्यावर थेट इथिलीनची फवारणी करून ती पिकविण्यात येत असल्याचे आढळल्यास तो संपूर्ण साठा नष्ट केला जाईल. फळांची हाताळणी, साठवून आणि विक्री करताना कशा प्रकारे काळजी घ्यावी, याबाबत फळ विक्रेत्यांच्या कार्यशाळाही घेण्यात आल्या आहेत, असेही प्रशासनाने म्हटले आहे.

# कर्करोग जनजागृती मोहिमेस गती द्या - सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई :** कर्करोग संशयित, निदान झालेल्या व उपचारासाठी दाखल रुग्णांची तपशीलवार यादी ठेवावी. त्यांच्या दररोजच्या तपासण्यांचे अहवाल जसे हिमोग्लोबिन, रक्तदाब, रक्तशर्करा याबाबतची माहिती अचूकपणे भरावी. तसेच जिल्हास्तरावरील अधिकारी व उपसंचालक यांनी अधिनस्त संस्थांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करावी, असे स्पष्ट निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आरोग्य अधिकाऱ्यांना दिले.

राज्यातील कर्करोग प्रतिबंध, जनजागृती आणि वेळेवर निदानासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचा आढावा मंत्री श्री.आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. या बैठकीस सहसंचालक, राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, आरोग्य भवन, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक परिमंडळांचे उपसंचालक, तसेच या जिल्ह्यांचे जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या कर्करोग जनजागृती व तपासणी मोहीम २०२५ तसेच कर्करोग निदान वाहनाच्या माध्यमातून होणाऱ्या तपासण्या यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यात ठाणे, पुणे आणि नाशिक या परिमंडळांतील कामकाजावर विशेष भर देण्यात आला.

# विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक खासगी संस्थेत

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची आगामी बैठक एका खासगी शिक्षण संस्थेत घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नगर आणि नाशिक येथे असलेल्या उपकेंद्रांना डावलून विद्यापीठासारख्या शासकीय संस्थेच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक खासगी संस्थेत आयोजित करण्याचे कारण काय, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यातील सदस्यांचा समावेश आहे. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत प्रशासकीय आणि धोरणात्मक मुद्द्यांवर चर्चा करून निर्णय घेतले जातात. आतापर्यंत अनेकदा मागणी करूनही व्यवस्थापन परिषदेचे निर्णय विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केले जात नाहीत.

असे असताना, व्यवस्थापन परिषदेतील एका सदस्याच्या नामांकित शिक्षण संस्थेचे कामकाज पाहण्याचे कारण काढून व्यवस्थापन परिषदेचा दोन दिवसीय दौरा आयोजित करण्यात आला आहे. त्याबरोबरच व्यवस्थापन परिषदेची बैठक त्याच संस्थेत घेण्याचेही नियोजन करण्यात आले आहे. मात्र, विद्यापीठाचे शासकीय कामकाज खासगी शिक्षण संस्थेत करण्याचे कारण काय, विद्यापीठाची उपकेंद्रे असताना खासगी शिक्षण संस्थेला प्राधान्य कशासाठी, असे प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.

विद्यापीठ प्रशासनाने व्यवस्थापन परिषदेची बैठक खासगी संस्थेपेक्षा उपकेंद्रात घेणे गरजेचे आहे. कुलगुरू व्यवस्थापन परिषदेची बैठक खासगी संस्थेत घेत असल्यास कुलगुरू आणि व्यवस्थापन परिषद खासगी संस्थाचालकांच्या किती प्रभावाखाली आहे हे दिसून येते, असे विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य डॉ. हर्ष गायकवाड यांनी सांगितले. विद्यापीठाकडे स्वत: सर्व प्रकारची साधन सुविधा उपलब्ध आहे. मात्र, खासगी संस्थेत व्यवस्थापन परिषदेत आयोजित करण्यामागील हेतू कळत नाही, तसेच असे करण्याची आवश्यकताही नाही, अशी भूमिका माजी अधिसभा सदस्य प्रा. धनंजय कुलकर्णी यांनी मांडली.

# पुलाच्या कठड्यावर रिक्षा आदळून तरुणाचा मृत्यू

**पुणे :** कात्रज-कोंढवा रस्त्यावरील पुलाच्या कठड्यावर रिक्षा आदळून प्रवासी तरुणाचा मृत्यू झाला. रिक्षाचालकाने अल्पवयीनाच्या ताब्यात रिक्षा चालविण्यास दिल्याने अपघाताची घटना घडल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी रिक्षाचालकासह अल्पवयीनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

रितेश शिवाजी गायकवाड (वय १९, रा. गोकुळनगर, कात्रज-कोंढवा रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी रिक्षाचालक जालिंदर बबन साळुंके (वय ३५, रा. साईबाबा मंदिराजवळ, कात्रज) याच्यासह एका अल्पवयीनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस शिपाई विठ्ठल चिपाडे यांनी या संदर्भात भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. रिक्षाचालक साळुंके, अल्पवयीन, गायकवाड हे ओळखीचे आहेत. १५ एप्रिल रोजी रिक्षातून कात्रज-कोंढवा रस्त्यावरून निघाले होते. त्या वेळी रिक्षाचालक साळुंकेने अल्पवयीनाला रिक्षा चालविण्यास दिली होती. भरधाव रिक्षावरील नियंत्रण सुटल्याने रिक्षा पुलाच्या कठड्यावर आदळली.

# बाबा भिडे पूल दीड महिना बंद, डेक्कन मेट्रो स्टेशन परिसरात पादचारी पूल उभारण्याचे काम सुरु

**पुणे :** डेक्कन जिमखाना आणि शहरातील मध्यवर्ती पेठांचा भाग जोडणारा बाबा भिडे पूल २१ एप्रिलपासून ६ जूनपर्यंत वाहतुकीसाठी पूर्ण बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे मेट्रोच्या डेक्कन जिमखाना स्टेशनच्या कामासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. शुक्रवारी सकाळीच हा पूल वाहतुकीसाठी अचानक बंद करण्यात आल्याने नागरिकांचा मोठा गोंधळ उडाला. त्यामुळे तूर्तास दोन दिवस हा पूल वाहतुकीसाठी सुरू ठेवण्यात येणार आहे. शहरातील मध्यवर्ती भागातील बाबा भिडे पूल बंद राहणार असल्याचा फलक शुक्रवारी सकाळी या ठिकाणी लावण्यात आला आणि पुलाच्या दोन्ही बाजूंना बॅरिकेट लावल्या. या पुलाचा वापर हजारो नागरिक करतात. नागरिकांना कुठलीही कल्पना न देता पूल अचानक बंद करण्यात आल्याने गोंधळ उडाला. पूल बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती मेट्रो प्रशासनाने महापालिकेला दिली नव्हती. परस्पर पूल बंद केल्याने अनेकांनी महापालिकेतील अधिकाऱ्यांना चौकशीसाठी फोन केल्यानंतर मेट्रोने हा पूल वाहतुकीसाठी बंद केल्याचे समोर आले.

# क्रांतिवीर चापेकर बंधूचे स्मारक युवकांना देशभक्तीचे संस्कार देणारे केंद्र ठरेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

▪ **मुख्यमंत्र्यांच्या हस्ते चिंचवड येथील क्रांतीवीर चापेकर स्मारकाचे लोकार्पण**

**पुणे :** 'हुतात्म्यांच्या कार्यातून देशभक्तीची प्रेरणा मिळत असते. चापेकर बंधु अशाच हुतात्मांपैकी एक होते. स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी दिलेले योगदान अमूल्य आहे. त्यांचे कार्य चापेकर स्मारकाच्या माध्यमातून नागरिकांसमोर येणार आहे. हे केंद्र खऱ्या अर्थाने युवकांना देशभक्तीचे संस्कार देणारे ठरेल. हे स्मारक उभारताना तंत्रज्ञानाचा अतिशय उत्तमरित्या वापर करण्यात आला असून ते केवळ पिंपरी चिंचवडसाठी मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या वैभवात भर घालणारे ठरेल,' असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आणि क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या क्रांतीवीर चापेकर स्मारकाचे लोकार्पण व राष्ट्रीय संग्रहालयाच्या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी ते बोलत होते.

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महेश लांडगे, शंकर जगताप, प्रशांत बंब, माजी खासदार विनय सहस्रबुद्धे, अमर साबळे, क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, क्रांतीवीर चापेकर यांचे वंशज प्रशांत चापेकर, प्रतिभा चापेकर, स्मिता चापेकर, चेतन चापेकर, मानसी चापेकर, जान्हवी जोशी, स्वराज्याचे सरसेनापती हंबीराव मोहिते यांचे वंशज विक्रमसिंह मोहिते, आद्य क्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांचे वंशज चंद्रकांत खोमणे नाईक, अमोल खोमणे नाईक, विशाल खोमणे नाईक, हुतात्मा राजगुरू यांचे वंशज सत्यशील राजगुरू उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते चापेकरांच्या वंशांजाचा सन्मान यावेळी करण्यात आला. मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, 'चापेकर वाडा येथे उभारण्यात येत असलेले स्मारक अतिशय सुंदर आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या स्मारकात चापेकर बंधू यांच्या जीवनाशी संबंधित एकूण १४ प्रसंग आहेत.' चापेकर बंधूनी केलेल्या रँडच्या वधाबद्दल सविस्तर माहितीही यावेळी त्यांनी दिली.